स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

# भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप



कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे



## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

१०३ डिजिटल माध्यमे आणि मराठी भाषेचे बदलते स्वरूप / प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने ........................ २८६
१०४ पत्रकारिता : भाषिक कौशल्य / डॉ. अनुसया नागनाथ नागीमे ........................ २८८
१०५ 'तृष्णा' या आदिवासी आत्मकथनातील भाषावैभव / प्रा.डॉ. कल्पना डी. गोरले-थोरात ........................ २९०
१०६ लोकसाहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे ........................ २९४
१०७ भाषा, बोली आणि संस्कृती सहसंबंध / साधना अरुण खोमणे ........................ २९७
१०८ मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध / डॉ. केशव धोंडिबा टिपरसे ........................ २९९
१०९ 'मोराची बायको' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखांचा मानसशास्त्रीय अभ्यास / निलम नंदलाल अडसुळे ........ ३०१
११० बालसाहित्य आणि बालगीतांतून प्रकट होणारे भावविश्व / डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार ........................ ३०३
१११ अभिजात मराठीचे लेखन / प्रा.डॉ.प्रवीण चंदनशिवे ........................ ३०६
११२ चित्रपट भाषा : एक अभ्यास / प्रा.डॉ. विठ्ठल पंढरीनाथ लंगोटे ........................ ३०८
११३ आदिवासींच्या 'दंडार' उत्सवातील लोकगीतांमधून आविष्कृत होणारे समाजजीवन /
राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे, मार्गदर्शक : प्रा.डॉ.संजय केशवराव लाटेलवार ........................ ३१०
११४ अध्यात्मिक शाहिरी : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र / प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ........................ ३१४
११५ मराठी भाषा आणि अन्य भाषांचा परस्परसंबंध / प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील ........................ ३१७
११६ शासकीय कामकाजातील कार्यालयीन भाषा व भाषा धोरण / डॉ. संतोष शहापूरकर ........................ ३२०
११७ मराठी भाषा विकासाची आव्हाने आणि उपाय / डॉ. रविकांत शिंदे ........................ ३२२
११८ मराठी भाषा, साहित्य व खेळ / डॉ. लोहिता माने ........................ ३२६
११९ इंग्रजी भाषांतरित 'फकिरा' कांदबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास / डॉ. वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव ....... ३२८
१२० मानवी विकास आणि भाषा उत्पत्ती / प्रांजली सत्यवान क्षीरसागर ........................ ३३१
१२१ मराठी कवितेचा राजकीय परिप्रेक्ष्य / डॉ. बळवंत मारुती मगदूम ........................ ३३५
१२२ मराठी भाषा आणि सोशल नेटवर्किंग /
श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे, मार्गदर्शक : डॉ. तानाजी अंबादास देशमुख ........................ ३३८
१२३ मराठी भाषा : सध्यस्थिती आणि रोजगाराच्या संधी / प्रा. डॉ. अशोक शेलार ........................ ३४१
१२४ मराठी विज्ञान कथात्मक साहित्यातील प्रयोगशीलता / प्रा. एस. बी. डफळापूरकर ........................ ३४४
१२५ मराठी साहित्याच्या आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या दिशा / प्रा. डॉ. सविता सुनिल केंजळे ........................ ३४६
१२६ 'भिवा फरारी' या कादंबरीचा समाजशास्त्रीय अभ्यास / प्रा. डॉ. मनोज बापुसाहेब तेलोरे ........................ ३४८
१२७ मराठीतील आदिबंध / सुनिता दुधाट, मार्गदर्शक : डॉ. माहेश्वरी गावीत ........................ ३५१
१२८ मराठीतील निसर्गविषयक साहित्य / डॉ. प्रदीप यशवंत पाटील ........................ ३५३
१२९ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय : आंतरविद्याशाखीय संदर्भ / डॉ. प्रवीण लोंढे ........................ ३५६
१३० मानवी विकास आणि भाषा / डॉ. सायली आचार्य ........................ ३६०
१३१ जागतिकीकरण आणि मराठी भाषा / प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ........................ ३६३
१३२ लोकगीतातील स्त्रियांची भाषा / प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर ........................ ३६६
१३३ लोकतत्त्वीय अभ्यासपद्धती : स्वरूप आणि निकषव्यवस्था / डॉ. आप्पासो आनंदा बुडके ........................ ३६९
१३४ लोकदैवतांविषयक मौखिक साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / डॉ. सदाशिव पाटील ........................ ३७२
१३५ वचनसाहित्य आणि संविधानिक मूल्ये / प्रा. प्रकाश बाळू नाईक ........................ ३७५
१३६ वाङ्मयीन संस्कृती / सौ. उज्वला सुनिल लांडगे ........................ ३७८
१३७ विद्रोहाची-परिवर्तनाची भाषा / डॉ. विजयकुमार रामदास घोडके ........................ ३८०
१३८ वैचारिक साहित्याचे स्वरूप / डॉ. शशिकला भीमराव रणदिवे ........................ ३८३



Scanned with OKEN Scanner

# जागतिकीकरण आणि मराठी भाषा

**प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर**

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज, जि. सांगली

**प्रस्तावना**

२१व्या शतकाच्या सुरुवातीला खाउजा धोरणाची सुरुवात झाली. म्हणजेच खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यांची चर्चा होऊ लागली. जवळजवळ संपूर्ण जग या खाजगीकरणाच्या विळख्यात अडकलेले पाहावयास मिळते. त्यामुळे अनेक देशातील उद्योगधंदे, बाजारपेठा आपल्या कह्यात घेतलेल्या पाहावयास मिळतात. जगातील विकसित राष्ट्रांनी एकत्र येऊन प्रत्यक्ष प्रत्यक्षपणे संपूर्ण जगावर लाधलेले हे धोरण आहे. वैश्विक चक्रव्यूहात होरपळून निघणाऱ्या भारताचं चित्र आपल्याला पाहावयास मिळतं. जागतिकीकरणातून समाजावर तसेच तेथील साहित्यावर परिणाम होत असतो. मानव हा आपल्या भावभावना व्यक्त करण्यासाठी भाषेचा वापर करत असतो. भाषा महत्त्वाची असते. आपले साम्राज्य एखाद्या भूप्रदेशावर लादण्यासाठी भाषा महत्त्वाची असून जागतिकीकरणामुळे भाषा बदलत गेलेली पाहावयास मिळते.

आर्थिक व्यवहार, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक तसेच साहित्य या विविध क्षेत्रांमध्ये विचारांचे आदानप्रदान वाढले. यातून वैचारिक देवाण-घेवाण होऊन याचा परिणाम साहित्यक्षेत्रावरही झालेला पाहावयास मिळतो. कल्पनारम्य साहित्य मागे पडून वास्तववादी साहित्य पुढे येत असून या साहित्याला चांगला प्रतिसाद मिळू लागला. या साहित्यातून समाजातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम होऊ लागले. यामुळे जागतिकीकरण पूर्णपणे चांगले अथवा पूर्णपणे वाईट आहे असे म्हणता येणार नाही. परंतु जागतिकीकरणाला सामोरे जाताना आपली भाषा, आपले साहित्य कसे सुरक्षित राहील हे पाहाणे गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे देश-विदेशातील समूह एकत्र येतात आणि जवळचे समूह दूर जाताना दिसतात. आपली भाषा, आपला समाज, आपली संस्कृती टिकेल की नाही याचा न्यूनगंड मनात निर्माण होतो. येणाऱ्या काळात अशा अनेक संकटांना तोंड देत असताना विविध देशांतील, अनेक परिसरातील भाषा जिवंत राहाणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या विळख्यात अडकलेली मराठी भाषा अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**जागतिकीकरण आणि मराठी भाषा**

भारतावर अनेक राष्ट्रांनी राज्य केलं. त्यामध्ये, डच, पोर्तुगाल, फ्रेंच, इंग्रज यांनी आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी आपली भाषा व धर्म यांचा प्रचार आणि प्रसार सुरू केला. त्यामुळे त्याचा परिणाम मराठी भाषेवरही झाला. या संकटातून मात करत मराठी भाषेने आपले अस्तित्व टिकवले. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळी जेव्हा जेव्हा मराठी भाषेवर संकटं आली तेव्हा मराठी भाषेच्या शुद्धीसाठी वि.का. राजवाडे तसेच इतर लेखकांनी अभ्यासकांनी प्रयत्न केले. अमृताते ही पैसा जिंकणाऱ्या मराठी भाषेच्या स्थितीबद्दल प्रा. रा.ग. जाधव म्हणतात, 'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी मराठी ही मुमुक्ष अवस्थेत आहे असे निराशेचे उदाहरण काढले होते. पण मराठी मृत झाली, हे खरे! तिचा विकास होतच राहिला, पण तो पुरेसा नाही. मराठी भाषेचा मध्ययुगीन इतिहास व विसाव्या शतकाचा उत्तरार्ध स्वातंत्र्योत्तर आधुनिक कालखंड या दोहोंत एक महत्त्वाचा व दूरगामी परिणाम करणारा फरक आहे. तो म्हणजे मध्ययुगीन व तत्कालीन राजवटीच्या जाचात असून ही अवघा मराठी समाज मराठी भाषेच्या पाठीशी उभा होता. आजही स्थिती आहे असे कोणी म्हणणार.'[१] जागतिकीकरणाच्या काळात मराठी भाषा मागे पडत जाऊन इंग्रजी भाषेला महत्त्व दिले जात असलेले पाहावयास मिळते.

आज समाजात इंग्रजी भाषेतील शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा कल वाढलेला दिसून येतो. त्यामुळे मराठी शाळांमध्ये शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी झाले आहे. कारण जागतिकीकरणात आपणाला टिकायचे असेल तर इंग्रजी भाषेशिवाय पर्याय नाही. असा समज झाला असून मराठी भाषिकांना इंग्रजी माध्यमात मुले शिकवणे हे अभिमानास्पद वाटून समाजामध्ये आपले वेगळे पण निर्माण करण्याची चढाओढ लागलेली पाहावयास मिळते. महाराष्ट्रात सद्यस्थितीला या विचारसरणीमुळे अनेक मराठी शाळा बंद होत असलेले दिसतात. आपली भाषा,

ISSN No. 2319-6025



Scanned with OKEN Scanner

आपले सत्व, आपला समाज, आपली संस्कृती टिकवायचे असेल तर आपली भाषा जतन करून ती समृद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. ज्या मोठ्या राष्ट्रांनी जागतिकीकरण लादण्याचा प्रयत्न केला त्यांनी मात्र आपले स्वत्व जपलेले पाहावयास मिळते. या संदर्भात भालचंद्र नेमाडे म्हणतात, 'आपल्यांला असं दिसेल की, हे जे स्वतःला जागतिकीकरणाचे अर्धवयू म्हणतात त्या देशांमधल्या भाषांची परिस्थिती आपण बघूया. उत्तर अमेरिकेतील कॅनडा आणि युनायटेड स्टेटसमधल्या भाषा या शंभर वर्षांपूर्वी १८६ होत्या. रेड इंडियन यांच्या धरून आज त्यातल्या ३८ उरल्या आहेत. बाकीच्या नाहीशा झाल्या. आलास्कामध्ये २० भाषा होत्या. आज तेथे २ भाषा राहिल्या आहेत. ही जागतिकीकरण करू इच्छिणाऱ्या गोऱ्या लोकांची कर्तबगारी लॅटिन अमेरिकेत बरेच युरोपीयन संस्कृती दडपून आहे. तेथे ४०० भाषा होत्या. आता फक्त १०८ भाषा राहिल्यात. पुढील वीस वर्षांत झपाट्याने या पण नाहीशा होतील, अशी भीती आहे. तमाशात ज्याप्रमाणे जी जी म्हणणारे जीलकरी असतात अशी काही अमेरिकेच्या ताटाखालची राष्ट्रे आहेत. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड वगैरे त्या देशातसुद्धा हीच परिस्थिती आहे. एक स्वार्थी सांस्कृतिक धोरण नेमके या सगळ्या देशात पाळले जाते. ऑस्ट्रेलियामध्ये आदिवासींच्या ३०० भाषा होत्या. आज फक्त ६५ भाषा उरलेल्या आहेत. इंग्लंडमध्ये तर इंग्रजीशिवाय कोणतीही भाषा वाचलेली नाही. वेल्स कशीबशी टिकून आहे. थोडीफार स्कॉटिश जीव धरून आहे. गेलिक, आयरीश गेली, कर्णिक कधीच मेली. मॅक्स २० वर्षांपूर्वीच नाहीशी झाले. गेलिक स्कॉटीशसारखी लहान भाषा पूर्वीच संपल्या. त्या मानाने हिंदुस्थानच्या ह्यूमन रायटर्स रेकॉर्डमध्ये हे सुद्धा धरले पाहिजे की, आज आपल्याकडे १६५२ भाषा गेल्या खानेसुमारीनुसार जिवंत बोलल्या जातात. ह्युमन राईटसच्या रेकॉर्डमध्ये तुमच्या देशात किती भाषा तुम्ही मारून टाकल्या याची ही कसोटी ठेवली पाहिजे. उलट असे म्हटले जाते की, इतक्या भाषा आहेत म्हणून हिंदुस्तानची प्रगती होत नाही. म्हणजे एक भाषा ठेवली तर तुमची प्रगती आपोआप होईल. वसाहतीकरणाच्या पोटातून निघालेल्या या जागतिकीकरणामुळे असे विचार पुढे येतात. इंग्रजी ही राष्ट्रभाषा होणे यामुळे क्रमप्राप्त आहे.'[२] असेच जर आपण आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगला नाही आणि इंग्रजीचे गोडवे गाऊ लागलो तर लवकरच आपल्या देशाची अवस्था इतर राष्ट्रांसारखी होईल.

जागतिकीकरणाच्या प्रभावात राहात असताना आपण आपल्या भाषेला जास्त महत्त्व देणे गरजेचे असते. कारण एखाद्या संपुष्टात आलेल्या भाषेचे पुनर्जीवन करणे अवघड होत असत. एखाद्या समाजाची जी भाषा असते ती भाषा बोलणाऱ्या त्या समाजातील शेवटचा व्यक्ती मृत झाला, तर त्याच्याबरोबर त्या समाजाची भाषा संपते. अशाप्रकारे मराठी भाषेचे अस्तित्व टिकून तिला जागतिक स्तरावर न्यायचे असेल, तर सर्वच क्षेत्रात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेला पाहिजे, यासाठी प्रयत्न करावयास हवे. तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष महेश एलकुंचवार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात, 'ज्या मानव समूहाने आपली भाषा गमावली, हरवली आहे. त्याची संस्कृती मृत व्हायला वेळ लागणार नाही. कारण भाषा हा संस्कृतीचा हुंकार असतो. भाषा व संस्कृती यांचा नाळेचा संबंध असतो व एकाशिवाय दुसरे जगू शकत नाही.'[३] यावरून असे लक्षात येते की, मानवी जीवनामध्ये जसा समाज महत्त्वाचा असतो. तसेच त्यांना एकत्र बांधणारी भाषा अत्यंत महत्त्वाची असते. ही भाषा जर टिकली तरच संस्कृती टिकते. अन्यथा, भाषेबरोबरच संस्कृतीचाही ऱ्हास होतो.

**जागतिकीकरण मराठी भाषा आणि आजची स्थिती**

जागतिकीकरणामुळे उद्योग, व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, सामाजिकक्षेत्र, आर्थिकक्षेत्र यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे. उद्योग व्यवसायात पाहिले गेले तर आज आपला उद्योग सातासमुद्रापलीकडे जाण्यासाठी आपण इंग्रजी भाषेचा वापर करतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात इंग्रजी शब्द आपल्या भाषेत मिसळले जात आहेत. उदा. चेक, मशीन, ट्रान्सपोर्ट इत्यादी. त्याचप्रमाणे आजच्या युगात संगणकाचा वापर अतिशय वेगवान पद्धतीने होत असून, त्याचा परिणाम मराठी भाषेवर झालेला पाहावयास मिळतो. संगणक इंटरनेट यामुळे जगाचे सर्व व्यवहार काही क्षणात पूर्ण होतात. पण आजच्या काळात संगणक प्रणालीमध्ये युनिकोडसारखी मराठी भाषा समाविष्ट केलेली पाहावयास मिळते. त्यामुळे आपणांला आपले व्यवहार कमी वेळात पूर्ण करता येतात.

आजची तरुण पिढी मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात करते. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन व्यवहारात इंग्रजी शब्द मोठ्या प्रमाणात वापरले जातात. उदा. नमस्कारऐवजी हाय, हॅलो परिणामी त्यांच्याकडून दिवसभरात अतिशय थोड्या प्रमाणात मराठी भाषा बोलली जाते. तसेच या मोबाईलच्या विविध कंपन्या आल्या. त्यांचे वेगवेगळे हँडसेट, सगळ्यांच्या कानात, गळ्यात हेडफोन आला. याच मोबाईलवर सिनेमा पाहाणे, फोटो काढणे, व्हिडिओ तयार करणे अशी महत्त्वाची कामे होऊ लागली. खरे पाहाता, यामुळे रोजगारही उपलब्ध झाला.


ISSN No. 2319-6025

Scanned with OKEN Scanner

मोबाईलच्या युगात माणसे माणसापासून दुरावली. कारण माणसांमध्ये संवाद अत्यंत कमी झाला. केवळ एसएमएस पाठवून लोक संवाद साधू लागले. त्यामुळे एखादा कार्यक्रमास प्रत्यक्षात हजर न राहाता केवळ दुरूनच त्याचा आनंद घेतला जाऊ लागला, तर दुसरीकडे यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात असणारे लोक व्हिडिओ-कॉल्सद्वारे एकत्र येऊ लागले.

जागतिकीकरणात आर्थिक क्षेत्रात प्रगती झाली. यामध्ये पैसे पाठवणे अथवा एखाद्याकडून पैसे घेणे सोपे झाले. उदा. गुगल-पे, फोन-पे. याबरोबरच या सर्वांचा परिणाम मानवी जीवन व्यवहार आणि पर्यायाने दैनंदिन जीवनात तसेच समाज व साहित्य यांच्यावर झालेला दिसून येतो. आज मराठी भाषेच्याबाबतीत विचार केला तर असे लक्षात येते की, काही भागातील बोलीभाषा ह्या जतन केल्या जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे विविध भागांतील, प्रांतांतील, खेडोपाडी, वाड्या-वस्तीवर राहाणाऱ्या लोकांच्या समुदायाच्या भाषा लोकसमुदायाच्या भाषा ज्या मौखिक आहेत. त्या लिखित स्वरूपात जतन केल्या जात आहेत. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी शासनाने विविध प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

**समारोप**

जागतिकीकरणाच्या विळखात सापडलेल्या मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी विविध स्तरावरून प्रयत्न केले जात आहेत. भाषा टिकली तर संस्कृती टिकते. अन्यथा, आपले स्वत्व हिरावून घेऊन जाणारे जागतिकीकरण आत्मसात करत असताना आपण आपल्या भाषेचा अभिमान बाळगणे महत्त्वाचे असून भाषा टिकवणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या २१व्या शतकात आपली माय मराठी ताट मानेने उभी आहे. इंग्रजीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात वर्चस्व असणाऱ्या या युगात मराठीला अभिजात दर्जा प्राप्त झाला असून, ही गौरवाची बाब लक्षात घेता आजच्या झपाटाने बदलत चाललेल्या जगात आणि जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषेला महत्त्व प्राप्त होऊन ते एका विशिष्ट उंच उंचीवर पोहोचलेले पाहावयास मिळते.

**संदर्भ**

१) जाधव रा.ग., (२०११), समाज आणि भाषा, लोकराज्य.
२) नेमाडे भालचंद्र, (२००३), साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, मुंबई, लोकवाङ्मय गृह प्रकाशन.
३) एलकुंचवार महेश, नाहटा विजय, (संपा.), (२०११), लोकराज्य.

◆◆◆

ISSN No. 2319-6025



Scanned with OKEN Scanner